महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN: U40109MH2005SGC153645
दूरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासं/रवका/न.क्र.९ कोविड-१९/२८०७९
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दिनांक : १७.११.२०२१

# परिपत्रक

**विषय : कोरोना विषाणू प्रसारास प्रतिबंधात्मक उपाय म्हणून मर्यादित कालावधीसाठी स्थगित केलेला बायोमेट्रीक उपस्थिती प्रणलीचा वापर सुरु करण्याबाबत.**

**संदर्भ :** १) परिपत्रक क्र. ED(HR)/Circular/८२८८ दि. १९.०३.२०१०.
२) परिपत्रक क्र. ED(HR)/BTAS/१०२६३ दि. ०७.०४.२०१५.
३) परिपत्रक क्र. मासं/रवका/न.क्र.९/७५८१ दि. ०५.०३.२०२०.
४) महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र.समय २०२०/प्र.क्र.३१/१८(र.व.का) दि. २८.१०.२०२१.

महाराष्ट्र शासनाकडुन आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ च्या अनुषंगाने कोविड-१९ विषाणु प्रादुर्भाव रोखण्यासाठी खबरदारी उपाय म्हणुन राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांमधील बायोमेट्रीक उपस्थिती प्रणालीचा वापर करण्यास पुढील आदेशापर्यंत स्थगिती देण्यात आली होती. त्या अनुषंगाने महावितरण कंपनीचे वरील संदर्भ क्र. ०२ नुसार कंपनीच्या सर्व कार्यालयातील बायोमेट्रीक उपस्थिती प्रणालीचा वापर करण्यास स्थगिती देण्यात आली होती.

२. आता, सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.समय २०२०/प्र.क्र.३१/१८ (र.व.का) दि. २८.१०.२०२१ नुसार सर्व शासकीय कार्यालयामधील बायोमेट्रीक उपस्थिती प्रणाली आता पुन्हा सुरु करण्यात बाबतच्या सूचना पारीत करण्यात आलेल्या आहेत. यास्तव सर्व कंपनीच्या अधिकारी व कर्मचारी यांनी यापुढे कोविड प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा वापर करुन (जसे हात सॅनिटाइझ करणे) बायोमेट्रीक उपस्थिती प्रणालीवरच त्यांची दैनंदिनी उपस्थिती नोंदवावी. कंपनीतील संबंधित कार्यालयांतील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी कार्यालयात येताना व कार्यालय सोडतांना त्यांची उपस्थिती बायोमेट्रीक प्रणाली मध्ये (Thumb Impression Or Face Recognition) द्वारे नोंदविण्याबाबत दक्षता घ्यावी. तसेच विभागप्रमुख/कार्यालयप्रमुख यांना अवगत करण्यात येते की, कोविड प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी जसे बायोमेट्रीक मशिनच्या जवळ हात सॅनिटाइझ करण्याची व्यवस्था इ. उपलब्ध करुन दयावी, जेणे करुन कोविड-१९ पसरण्याचा धोका राहणार नाही.

३. सबब, महाविरण कंपनीतील सर्व प्रशासकीय कार्यालयांमधील संबंधीत अधिकाऱ्यांना कळविण्यात येते की, संदर्भ क्र. ०४ मध्ये निर्गमित केलेल्या सुचनांचे अवलोकन करून त्याबाबत आपल्या स्तरावर काटेकोर पणे अंमलबजावणी करण्यात यावी. त्याच प्रमाणे सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी त्यांची उपस्थिती करीता बायोमेट्रीक प्रणाली मध्ये (Thumb Impression Or Face Recognition) पंजीकृत करुन घ्यावे. अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थिती थेट पगार पत्रक प्रणाली सोबत जोडण्यात आली असल्याने सर्व कर्मचाऱ्यांचे पगार बायोमेट्रीक उपस्थिती प्रमाणेच करण्यात येतील यांची सर्वांनी नोंद घावी.

४. उपरोक्त सुचना दि. ०१.१२.२०२१ या तारखेपासुन लागु राहिल.

५. सदर परिपत्रक कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

सोबत - शासन निर्णय.

(अ.प्र. भादीकर)
कार्यकारी संचालक (मासं)

**प्रत सविनय सादर :**
१) संचालक (वित्त)/ (संचलन)/ (वाणिज्य)/ (प्रकल्प)/ (मासं) म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.
२) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय औरंगाबाद/ कल्याण.

D:\Old Data\O&M 01.07.2017\F-9 Misslenious\ON Marathi\BIO Matric Attendance.docx

**प्रत सस्नेह रवाना :**

१) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/ नागपूर.

२) कार्यकारी संचालक (सुवअं)/ (वित्त)/ (देयके व महसूल) म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.

**प्रत रवाना :**

१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/ (सांघिक वित्त) / (अंतर्गत लेखापरिक्षण) / (माहिती तंत्रज्ञान) / मुख्य विधी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.

२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या., नाशिक.

३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई-५१.

४) मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या. परिमंडळ कार्यालय (सर्व)

५) महाव्यवस्थापक (मासं)/ (मासंव्यप्र)/ (नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.

६) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/ मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.

७) मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्यकारी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई-५१.

कोरोना विषाणू प्रसारास प्रतिबंधात्मक उपाय म्हणून मर्यादित कालावधीसाठी स्थगित केलेला बायोमेट्रीक उपस्थिती प्रणालीचा वापर सुरु करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : समय - २०२०/प्र.क्र.३१/१८ (र. व का.),
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,
दिनांक : २८ ऑक्टोबर, २०२१.

वाचा :-

१.सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक : समय २०२०/प्र.क्र.३१/१८ (र.व का.), दिनांक १६ मार्च, २०२०.

२. सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे आदेश क्रमांक : कोरोना २०२१/प्र.क्र.३६६/आरोग्य-५, दिनांक ०२ ऑगस्ट, २०२१.

शासन परिपत्रक :-

कोरोना विषाणूंचा प्रसार राज्यातील कार्यालयांमध्ये होऊ नये तसेच राज्यातील अधिकारी / कर्मचारी यांना त्याचा संसर्ग होऊ नये, यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांमधील बायोमॅट्रीक उपस्थिती प्रणालीचा वापर उक्त संदर्भ क्रमांक - १) येथील परिपत्रकान्वये पुढील आदेश होईपर्यंत स्थगित करण्यात आला होता. या कालावधीमध्ये अधिकारी / कर्मचारी यांची कार्यालयातील उपस्थिती हजेरीपटावर नोंदविण्याबाबत आस्थापना शाखांनी आवश्यक ती उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले होते.

२. “ब्रेक द चेन - सुधारीत मार्गदर्शक सूचना” या अंतर्गत सार्वजनिक आरोग्य विभागाच्या उक्त संदर्भ क्रमांक - २ येथील दिनांक ०२/०८/२०२१ रोजीच्या आदेशान्वये सर्व शासकीय कार्यालये पूर्ण क्षमतेने (१००%) सुरु करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. त्यानुसार ऑगस्ट, २०२१ पासून शासकीय कार्यालये पूर्ण क्षमतेने सुरु झालेली आहेत. या परिस्थितीत शासकीय कार्यालयातील बायोमेट्रीक उपस्थिती प्रणाली लवकरात लवकर सुरु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

३. उक्त पार्श्वभूमीवर सर्व शासकीय कार्यालयामधील बायोमेट्रीक उपस्थिती प्रणाली आता पुन्हा सुरु करण्यात येत आहे. त्यामुळे सर्व शासकीय अधिकारी / कर्मचारी यांनी यापुढे कोविड प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा वापर करुन (जसे हात सॅनिटाईझ करणे) बायोमेट्रीक उपस्थिती प्रणालीवरच त्यांची दैनंदिनी उपस्थिती नोंदवावी. मंत्रालयीन प्रशासकीय विभागांच्या /

कार्यालयांच्या आस्थापना शाखांनी सर्व अधिकारी / कर्मचारी कार्यालयात येताना व कार्यालय सोडताना त्यांची उपस्थिती बायोमेट्रीक प्रणालीवरच नोंदवत आहेत याची दक्षता घ्यावी. तसेच विभागप्रमुख / कार्यालयप्रमुख तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी याकरीता आवश्यक कोविड प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी जसे बायोमॅट्रीक मशिनच्या जवळ हात सॅनिटाईझ करायची व्यवस्था इ. उपलब्ध करुन दयावी, जेणे करुन कोविड - १९ पसरण्याचा धोका राहणार नाही.

४. माहिती व तंत्रज्ञान उपविभाग, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ यांनी शासकीय कार्यालयातील बंद केलेली बायोमेट्रीक उपस्थिती प्रणाली तातडीने सुरु करण्याची कार्यवाही करावी.

५. सदरचे आदेश ते निर्गमित केल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

६. सदर शासन परिपत्रक हे महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०२११०२८१४४३२८६५०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Indra Mallo

Digitally signed by Indra Mallo
DN: c=IN, o=Personal, 2.5.4.20=92b852624baa852a6d07acef786c78e703b2b218958e8c193232b2 8a89b9cf9a, postalCode=400021, st=Maharashtra, serialNumber=ecae14ed1e3640fe493f5246d6381f68a38e03589870d467c9 bac54f641fcf32, cn=Indra Mallo
Date: 2021.10.28 14:48:34 +05'30'

**(इंद्रा मालो)**

**सचिव (प्र.सु.,र.व का.)**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव (५ प्रती), पत्राने,
२. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
३. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
४. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
५. मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
६. मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
७. सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य,
८. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव(५ प्रती), मंत्रालय, मुंबई ४०००३२,
९. मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई ४०००३२,
१०. सर्व मा.मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०००३२,